वर्ष : ०४ | अंक: १७ | मुंबई, मंगळवार २० मार्च २०१८ ते २६ मार्च २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 ...तर बिल्डरांनी करारनामा करणे बंधनकारक!

3 → बंदीचा देखावा नको

भाजपला कोकणातून हद्दपार करू ← 4



# 'राज'गर्जना
# भारत मोदीमुक्त झाला पाहिजे

**मुंबई : देशाला १९४७ साली पहिले स्वातंत्र्य मिळाले. १९७७ला आणीबाणीत दुसरे स्वातंत्र्य मिळाले. आता, २०१९ साली तिसरे स्वातंत्र्य देशाला मिळायला हवे. गुजरात सोडून बाकीच्या राज्यांचा नरेंद्र मोदी दुस्वास करतात. लोकांची सतत फसवणूक करणारे हे सरकार आता घालवायलाच हवे. २०१९ साली 'मोदीमुक्त' भारत करण्याची गरज आहे, असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. देशाला झालेला हा आजार घालवायलाच हवा. त्यासाठी मोदींविरोधात सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र यायला हवे, असे आवाहनही राज यांनी केले.**

गुढीपाडव्यानिमित्त शिवाजी पार्कवरील मनसेच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाध्यक्ष अमित शाह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. सत्तेत आल्यापासून नरेंद्र मोदी लोकांची निव्वळ फसवणूक करत आहेत. देशाला दिलेले एकही आश्वासन ते पूर्ण करू शकले नाहीत. न्यायसंस्थेपासून माध्यमांपर्यंत सर्वांची मुस्कटदाबी केली जात आहे. सरकारच्या विरोधात बोलणाऱ्यांना संपविण्यात येत आहे. देशात एक प्रकारची अघोषित आणीबाणीच लादली आहे. २०१४ पूर्वी मोदींनी 'काँग्रेसमुक्त' भारताचे आवाहन केले होते. महाराष्ट्र आणि देश वाचवायचा असेल, तर आता 'मोदीमुक्त' भारतासाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र यायला हवे, असे आवाहनही राज यांनी केले.

देशातील आणि राज्यातील भाजपा सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. लोकांना सांगण्यासारखे यांच्याकडे काही उरले नाही. त्यामुळे २०१९ साली निवडणुका जिंकण्यासाठी हिंदू-मुस्लीम धार्मिक दंगली घडविण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक अयोध्येतील राम मंदिराचा मुद्दा पुढे केला जात आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात राम मंदिर प्रश्नावर सुनावणी सुरू आहे. २०१९च्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच ही सुनावणी पुढे सरकेल, याची व्यवस्था भाजपाकडून केली जात आहे. निवडणुकांच्या तोंडावर बरोबर हे घडेल. राम मंदिराचा विषय घडला की, ताबडतोब दंगली घडवा, अशी चर्चादेखील या मंडळींनी काही मुस्लीम संघटनांशी केल्याचा गंभीर आरोप, राज ठाकरे यांनी आपल्या भाषणादरम्यान केला. राम मंदिर झालेच पाहिजे, पण तुमच्या राजकारणासाठी दंगली घडवून नको. निवडणुकीनंतर मंदिर झाले तरी चालेल, असे राज म्हणाले.

यापूर्वीही महाराष्ट्रासह इतरत्र जातीय संघर्षाचा कट रचला जात असल्याचे मी सांगितले होते, तसेच भाकीत दाऊदबद्दल केले होते. मी काही राजकीय भविष्य सांगत नाही, पण राजकारणाबाबत माझे निश्चित ठोकताळे असतात. जातीय संघर्ष, दाऊदबद्दल ते खरे ठरले. आता या मंडळींनी हिंदू-मुस्लीम दंगलीचा डाव आखला आहे. तो उधळून लावण्यासाठी सर्वांनी जागरूक राहायला हवे, असेही राज म्हणाले. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. आता तर बेरोजगारांची नोंद ठेवण्याचे कामच सरकारने बंद केले आहे. अमित शहा तर पकोडे म्हणजे वडे विकणे, हासुद्धा रोजगार असल्याचे म्हटले. मग मोदी इतके दिवस जगभर वड्याचे पीठ आणायला फिरत होते का? परदेश दौऱ्यातून गुंतवणूकच आली नाही, असे राज म्हणाले.

## मोदीमुक्त भारत हे जरा जास्तच झालं, राज ठाकरेंनी स्तर पाहून बोलावे

**मुंबई : महाराष्ट्रातील जनतेने ज्यांना 'रोजगारमुक्त' केलं, त्यांनी 'मोदीमुक्त भारता'ची मुक्ताफळे उधळली आहेत, अशा शब्दात मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मोदीमुक्त भारत या घोषणेचा खरपूस समाचार घेतला. तसेच, 'मोदीमुक्त भारत' हे जरा जास्तच झाले, राज ठाकरेंनी आपला स्तर पाहून बोलावे, असेही ते म्हणाले. मुंबईतील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज ठाकरेवर बोचरी टीका केली. ते म्हणाले की, याआधी राज ठाकरेंच्या भाषणांवर बाळासाहेब ठाकरेंचा प्रभाव दिसायचा, पण हल्ली शरद पवार यांचा प्रभाव दिसून येतो. पुबोलताना ते म्हणाले की, २०१४ च्या निवडणूकीत विधानसभा 'मनसेमुक्त' झाली, मुंबई महापालिकेतील उरले-सुरलेले नगरसेवकही पळून गेले. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता आता यांच्यावर विश्वास ठेवणार नाही, अशी टीका शेलारांनी राज ठाकरेंवर केली.**





# शिवसेना पाठिंबा काढण्याच्या तयारीत!
## 'मोठा निर्णय' होण्याची दाट शक्यता

**मुंबई : आंध्रातील चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडल्याने आता शिवसेनेच्या निर्णयाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री'वर पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत 'मोठा निर्णय' होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

२०१९ च्या निवडणुका डोळ्यापुढे ठेवून सत्तेतून बाहेर पडून भाजपाविरोधात आणखी आक्रमकपणे रस्त्यावर उतरण्याचा शिवसेनेचा मनसुबा आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकत्याच 'शिवालयात' विभागनिहाय शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. सत्तेतील सहभाग, भाजपाशी युती, पक्षाच्या मंत्री-आमदारांकडून मिळणारी वागणूक, होणारी कामे, नियुक्त्या, जनतेचे प्रश्न, पक्षसंघटन अशा विविध मुद्द्यांवर मते जाणून घेतली. सत्तेला लाथ मारून रस्त्यावर उतरत शिवसेनेने आपल्या मूळ रूपात यावे, यावर राज्यभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये एकमत असल्याचे दिसून आले.

शरद पवार-राहुल गांधी भेटीने राज्यात आता राष्ट्रवादी भाजपा सरकारच्या पाठीशी राहणार नाही, तटस्थ राहील असे संकेत मिळत

उर्वरित पृष्ठ 2 वर

# कोरेगाव भीमा प्रकरण
# मिलिंद एकबोटेला काळं फासण्याचा प्रयत्न



**पुणे:** कोरेगाव भीमा हिंसाचार प्रकरणातील आरोपी मिलिंद एकबोटेला न्यायाधीशांच्या कक्षाबाहेर काळं फासण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलंय. तो नेमका कोण आहे, कुठल्या संघटनेशी संबंधित आहे, याबाबतची माहिती मिळू शकलेली नाही. दरम्यान, मिलिंद एकबोटेला २१ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

भीमामध्ये हिंसाचार घडविल्याचा आरोप ठेवत १४ मार्च रोजी मिलिंद एकबोटेला अटक करण्यात आली होती. मिलिंद एकबोटेचा जामीन अर्ज सुप्रीम कोर्टाने बुधवारी फेटाळल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी त्याला अटक केली. अटकेनंतर मिलिंद एकबोटेला न्यायालयात हजर करण्यात आल्यावर १९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनाविण्यात आली होती. पुणे सत्र न्यायालयाने २२ जानेवारीला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात अपील केलं होतं. पण उच्च न्यायालयानेही त्यांना अटकेपासून संरक्षण देण्यास स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. १ जानेवारी रोजी शौर्य दिनानिमित्त कोरेगाव भीमा येथे विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी संपूर्ण राज्यातून हजारोंच्या संख्येने आंबेडकरी अनुयायी आले होते. त्या वेळी तेथे दगडफेक, जाळपोळ झाली होती. ही दंगल घडवून आणल्याप्रकरणी शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष संभाजी भिडे आणि मिलिंद एकबोटे यांच्यावर शिक्रापूर पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल आहे.

# 'प्रकाश आंबेडकरांमुळेच महाराष्ट्र पेटला'


**सांगली :** कोरेगाव-भीमाप्रकरणी श्री शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे गुरुजींना अटक करण्यासाठी भारिप-बहुजन महासंघाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी विधानसभेला घेराव घालण्याचा इशारा देताच भिडे गुरुजी यांनी पत्रकार परिषद घेऊन कोरेगाव-भीमाप्रकरणी प्रकाश आंबेडकर यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. आंबेडकर यांचे नक्षलवाद्यांशी कनेक्शन असून त्यांच्या विधानामुळेच महाराष्ट्र पेटल्याचा दावा करताना आंबेडकर आणि एल्गार परिषदेकडून



दंगलीच्या नुकसानभरपाईची वसुली करण्याची मागणीही त्यांनी केली. तसेच येत्या २८ मार्च रोजी राज्यव्यापी मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला.

श्री शिवप्रतिष्ठानच्यावतीने संभाजी भिडे गुरुजी यांच्या पत्रकार परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करतानाच गेल्या चार-पाच वर्षांत आपण पुण्याजवळच्या वढू गावाकडे फिरकोलच नसल्याचं स्पष्ट केलं.

उर्वरित पृष्ठ 2 वर




## सौजन्य व्हॉट्सअप




## सावधान! तुमचं व्हॉट्सॲप अकाऊंट सुरक्षित आहे का?
# चिनी हॅकर्स करताहेत व्हॉट्सॲपला लक्ष्य

**बंगळुरू** - वापण्यास सुलभ असल्याने गेल्या काही काळात व्हॉट्सॲप लोकप्रिय ठरले आहे. व्हॉट्सॲपवरील ग्रुपमधून अगदी गप्पांपासून ते ऑफीसमधील महत्त्वाच्या माहितीचीही देवाणघेवाण होत असते. मात्र व्हॉट्सॲपवरील वैयक्तिक सुरक्षा धोक्यात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. चिनी हॅकर्सकडून व्हॉट्स ॲप हॅक करण्याचे प्रयत्न होत असल्याचे भारतीय लष्कराकडून सांगण्यात आले असून, व्हॉट्सॲपचा वापर करताना खबरदारी घेण्याचा इशारा लष्कराने दिला आहे.



सुमारे चार महिन्यांपूर्वी लष्कराने लाइन ऑफ ॲक्चुअल कंट्रोलवर तैनात असलेल्या जवानांना व्हॉट्स ॲपसह अनेक धोकादायक ॲपच्या वापराबाबत इशारा दिला होता. भारतीय लष्कराच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून रविवारी एक व्हिडिओ ट्विट करून चिनी हॅकर्सकडून व्हॉट्स ॲपला असलेल्या धोक्याबाबत माहिती देण्यात आली आहे. तसेच व्हॉट्स ॲप वापरणाऱ्यांना त्यासंदर्भातील खबरदारीचा इशाराही देण्यात आला आहेत.

# ...तर बिल्डरांनी करारनामा करणे बंधनकारक!

**मुंबई- ग्राहकांकडून दहा टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम स्वीकारणाऱ्या विकासकांनी नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक असून असे न करणाऱ्या विकासकांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे (महारेरा) अध्यक्ष गौतम चॅटर्जी यांनी दिला आहे. प्रकल्पखर्चाच्या पाच टक्के इतका दंड होऊ शकतो, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.**

'मुंबई ग्राहक पंचायती'च्या वतीने बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे सभागृहात 'जागतिक ग्राहक दिना'निमित्त चॅटर्जी यांच्याशी वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी रेरा कायद्यातील तरतुदीकडे लक्ष वेधताना जे प्रकल्प महारेराकडे नोंदले गेले आहेत, त्या प्रकल्पात विकासकांनी दहा टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम स्वीकारली असली तरी करारनामा केलेला नाही, ही बाब अधोरेखित केली. अशा विकासकांविरुद्ध महारेरा कारवाई करणार का, असा सवाल केला असता चॅटर्जी यांनी हा इशारा दिला. इतकेच नव्हे तर याबाबत महारेराकडून अधिकृत परिपत्रकही काढले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. रेरा कायद्यात सुरुवातीला दहा टक्के तर मोफा कायद्यात २० टक्के रक्कम स्वीकारण्याची मुभा आहे. त्यानंतर मात्र संबंधित ग्राहकाशी करारनामा करणे बंधनकारक आहे. परंतु मोफा कायद्यात तरतूद असतानाही अनेक विकासकांनी त्या वेळी ५० टक्के रक्कम स्वीकारूनही करारनामा करण्याची टाळाटाळ केली होती. रेरा कायदा लागू झाल्यानंतर दहा टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम स्वीकारल्यास करारनामा नोंदणीकृत करणे बंधनकारक आहे. तरीही अनेक विकासक टाळाटाळ करीत असल्याच्या तक्रारी आहेत. परंतु दहा टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम मिळाल्यास विकासकांना करारनामा नोंदणीकृत करावाच लागेल, असे चॅटर्जी यांनी स्पष्ट केले. अन्यथा प्रकल्पखर्चाच्या पाच टक्के दंड आकारला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



# मुंबईत लोकल ट्रेन्समधून दररोज १०० मोबाइल चोरीला

**मुंबई-** लोकल ट्रेन ही मुंबईकरांसाठी लाइफलाइन. याच लाइफलाइमध्ये मोबाइल चोरीच्या दररोज किमान १०० घटना घडतात अशी माहिती समोर आली आहे. मोबाइल चोरीचे १०० गुन्हे रोज दाखल होतात अशी माहिती GRP नी दिली. प्रत्येक पोलीस ठाण्यात मोबाइल चोरीच्या किमान १० तक्रारी दाखल होतात. २०१७ या पूर्ण वर्षात १८ हजार मोबाइल चोरीला गेल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या. लोकल ट्रेनमधून मोबाइल चोरी होण्यासंदर्भातल्या याच तक्रारी आहेत अशीही माहिती पोलिसांनी दिली. जे प्रवासी त्यांचा मोबाइल मिळण्याची आशाच सोडून देतात ते पोलिसात तक्रार द्यायला येत नाहीत. पोलिसात तक्रार न देणाऱ्या प्रवाशांचेही प्रमाण बरेच आहे असेही पोलिसांनी म्हटले आहे.

मोबाइल चोरी करण्यामध्ये १६ ते २५ वर्षे वयापर्यंतची मुले आघाडीवर आहेत अशीही धक्कादायक माहिती समोर आली आहे. लोकल स्थानकांमध्ये विदाऊट तिकिट चढणाऱ्या या भुरट्या चोरांवर आम्ही कारवाई करतो आहोत. खांबाच्या मागे उभे राहून प्रवाशांच्या हातातील मोबाइल हिसकवायचा आणि पळ काढायचा ही पद्धत हे चोर सर्रास वापरताना दिसतात अशी माहिती पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी दिली. मे २०१७ मध्ये आम्ही मोबाइल चोरीच्या १२६ तक्रारी नोंदवल्या. जून मध्ये हे प्रमाण १ हजार १८७ तक्रारींवर गेले. प्रवाशांच्या हातून मोबाइल हिसकावून पळ काढला की हे भुरटे चोर पळ काढतात. माहिम आणि



बांद्रा या दोन स्थानकां दरम्यान चोऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचेही कराड यांनी सांगितले.

काही चोर ट्रॅकवर उभे राहूनही लोकलमधल्या प्रवाशांचे मोबाइल खेचतात. ट्रॅकवर सीसीटीव्ही कॅमेरे नसतात त्यामुळे आम्ही हे चोर नेमके कशा प्रकारे मोबाइल चोरून पळ काढतात हे सांगू शकत नाही असेही पोलिसांनी म्हटले आहे. ट्रेनमध्ये मोबाइलवर सिनेमा किंवा चॅटिंग करणाऱ्यांचे प्रमाण भरपूर आहे. लक्ष नसताना मोबाइल खेचला जातो आणि मग प्रवाशावर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. मात्र लोकल ट्रेनमध्येच मोबाइल चोरीला जाण्याची प्रकरणे वाढीला लागली आहेत असेही पोलिसांनी म्हटले आहे.

# शाळाबाह्य मुले वाऱ्यावरच

**मुंबई-** शाळाबाह्य मुलांचे दोन वर्षांपूर्वी एकदा सर्वेक्षण करून आता मात्र या विद्यार्थ्यांचा व्यवस्थेला विसर पडल्याचेच दिसत आहे. उच्च न्यायालयाने आदेश देऊनही अद्याप शासनाने या मुलांचे सर्वेक्षण आणि आनुषंगिक



उपाय योजना केल्या नसल्याचे समोर आले आहे.

राज्यात शिक्षण विभागाने २०१४ मध्ये शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण केले. मात्र, राज्यभर विविध ठिकाणी शाळाबाह्य मुले दिसत असताना सर्वेक्षण करणाऱ्या स्वयंसेवकांना ती दिसली नाहीत आणि या सर्वेक्षणाचा अहवाल वादात सापडला. त्यानंतर याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे जनहित याचिका दाखल करण्यात आली. त्यावर शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाय योजना करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

महिला बालकल्याण विभाग, बाल हक्क आयोगाला याबाबतच्या अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले होते. याबाबत ३१ मार्चपूर्वी उपाय आखण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, अद्यापही महिला आणि बालकल्याण विभागाने काहीही हालचाल केली नसल्याचा आक्षेप शाळाबाह्य मुलांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून घेण्यात येत आहे. त्याचवेळी आदेश शिक्षण विभागाला देण्यात आले नसल्यामुळे त्यांनीही हात वर केले आहेत. शासनाने २०१४ मध्ये सर्वेक्षण केले, त्यानंतर या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

# अल्पसंख्याक, 'ओबीसीं'कडे राज्य सरकारचे दुर्लक्ष

**मुंबई-** अल्पसंख्याक समाजाकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा घरचा अहेर देत अल्पसंख्याक समाजाबाबत सरकारच्या मनात नेमके आहे तरी काय, असा सवाल भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी आपल्याच सरकारला केला. अर्थसंकल्पावरील अनुदान मागण्यांच्या चर्चेत सहभागी होताना एकनाथ खडसे बोलत होते. राज्य सरकार ओबीसी, अल्पसंख्याकांबाबत उदासीन असल्याची टीकाही खडसे यांनी केली. माझ्या मतदारसंघात तीन वर्षांपूर्वी अल्पसंख्याकांसाठी तंत्रनिकेतन करण्याचा निर्णय झाला. त्यासाठी जागा दिली. निविदाही



निघाली. मात्र निधी नसल्याने ते होऊ शकले नाही. निधीसाठी सगळीकडे फिरलो, मात्र निधी मिळाला नाही. सरकारची अल्पसंख्याक समाजाबाबतची भूमिका काय आहे हे यावरून दिसून आल्याचेही खडसे यांनी सुनावले.

जलयुक्त शिवार योजनेची कामे पहिल्या वर्षी ज्या प्रमाणात सुरू होती त्याच्या केवळ २५ टक्के कामे सुरू आहेत.

योजनेला सध्या निधीही मिळत नाही. अनेक कामांत भ्रष्टाचार झाला आहे. मराठवाड्यात याबाबत गुन्हेही दाखल आहेत. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून किती गावे दुष्काळमुक्त झाली, किती पैसा खर्च झाला, पाणी साठवण क्षमता किती वाढली, सिंचन किती वाढले, दुष्काळी भागातील पाणीपातळी किती वाढली ही सर्व माहिती सभागृहात द्यावी, अशी मागणी खडसे यांनी केली. ही योजना मुळात चांगली आहे. मात्र त्यात अटीच अधिक आल्याची टीका त्यांनी केली.

# स्वबळाच्या नाऱ्यानंतरही सेना-भाजप एकत्र

**मुंबई-** आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्धार शिवसेनेने केला असला तरी, मुंबई महानगरपालिकेच्या एका प्रभागाच्या पोटनिवडणुकीकरिता शिवसेना आणि भाजप एकत्र आले आहेत. ही एकत्र येण्याची नांदी असल्याची चर्चा विधान भवन परिसरात सुरू झाली.

मुंबई महानगरपालिकेच्या प्रतीक्षानगर विभागातील प्रभाग क्र. १७३ मध्ये पोटनिवडणूक होत आहे. शिवसेना नगरसेवक प्रल्हाद ठोंबरे यांच्या निधनाने ही जागा रिक्त झाली आहे. या प्रभागात भाजपने पाठिंबा द्यावा म्हणून शिवसेनेचे मंत्री व काही आमदारांनी विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. भाजप नगरसेविका शैलजा गिरकर यांच्या निधनाने रिक्त झालेल्या प्रभागात गेल्या डिसेंबरमध्ये पोटनिवडणूक झाली असता शिवसेनेने भाजपला पाठिंबा दिला होता. शिवसेना नगरसेवकाच्या निधनाने रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत असल्याने या वेळी भाजपने पाठिंबा द्यावा, अशी शिवसेनेची भूमिका होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही भूमिका मान्य केली. या पोटनिवडणुकीत भाजप शिवसेना उमेदवाराला पाठिंबा देईल, असे मुंबई भाजपचे अध्यक्ष आशीष शेलार यांनी जाहीर केले.

# पाणीबाटली, दुधाच्या पिशवीसाठी छुपा 'प्लास्टिक कर'!

**मुंबई-** राज्यात गुढीपाडव्यापासून प्लास्टिक तसेच थर्माकोल वस्तूंवर बंदी घालतानाच पाण्याची बाटली आणि दुधाच्या पिशव्या, यातील प्लास्टिक वापरावर सरकारने उत्पादकांच्या दबावामुळे चाप लावलेला नाही. मात्र त्याचा भार सर्वसामान्यांवरच टाकण्यात आला असून प्रत्येक बाटलीमागे एक रुपया आणि दुधाच्या पिशवीमागे आठ आणे असा जणू छुपा 'प्लास्टिक कर'च जनतेच्या माथी मारण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेत संतप्त प्रतिक्रिया उमटत असून या सरकारी प्लास्टिकबंदीची खिल्ली समाजमाध्यमांवर उडवली जात आहे.

पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी शुक्रवारी विधानसभेत प्लास्टिकबंदीची घोषणा केली. या बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांना जास्तीत जास्त २५ हजार रुपये दंडाची आणि तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची तरतूद शिक्षेत आहे. दर तीन



महिन्यांनी या बंदीचा आढावा घेऊन त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील, असेही त्यानी सांगितले. दुधासाठीच्या ५० मायक्रॉनपेक्षा जाड प्लास्टिक पिशव्यांना बंदीतून वगळण्यात आले आहे. मात्र या पिशव्यांची पुनर्प्रक्रिया -पुनर्खरेदी पद्धती विकसित करण्यासाठी अशा पिशव्यांसाठी ग्राहकांनाच ५० पैसे भुर्दंड सोसावा लागणार आहे. दुकानातून पिशवीबंद दूध खरेदी करताना दुधाच्या मूळ किंमतीपेक्षा एका पिशवीमागे अतिरिक्त ५० पैसे तर पाण्याच्या बाटलीमागे अतिरिक्त एक रुपया ग्राहकांना द्यावा लागेल. त्यानंतर दुधाची रिकामी पिशवी किंवा पाण्याची रिकामी बाटली पुन्हा दुकानदाराकडे दिल्यानंतर हे अतिरिक्त पैसे परत मिळतील. मात्र या रिकाम्या बाटल्या-पिशव्या परत केल्या गेल्या नाहीत, तर पैसे वाया जाणार आहेत. त्याचप्रमाणे या रिकाम्या बाटल्या आणि पिशव्या परत घेऊन त्यांच्यासाठी आकारलेला जादा दर परत करणे दुकानदारांना बंधनकारक करण्यात आले आहे. प्लास्टिक उत्पादक कारखान्यांनाही उत्पादित बाटल्या आणि पिशव्यांपैकी किती परत आल्या, याचा हिशेब द्यावा लागणार असून उत्पादनापूर्वी ग्राहकाप्रमाणे सरकारकडे रक्कम जमा करावी लागणार आहे. उत्पादित माल पुनर्प्रक्रियेसाठी पुन्हा आला नाही तर ही रक्कम सरकारजमा होणार आहे. त्यामुळे प्लास्टिक बंदीच्या नावावर हा द्राविडी प्राणायामच ग्राहक, विक्रेते आणि उत्पादकांच्या नशिबी आला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पर्यावरण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शक्तीप्रदत्त समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीतर्फे दर तीन महिन्यांनी अंमलबजावणीचा आढावा घेऊन नियमनांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

# कचरा घोटाळ्यात पालिका गोत्यात!

***मुंबई- घनकचरा घोटाळ्यात दोषी आढळलेल्या तसेच काळ्या यादीत टाकण्याचे जाहीर करण्यात आलेल्या कंत्राटदारांनाच पुन्हा कामे देण्याच्या मुंबई महापालिकेच्या निर्णयाची चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. त्यामुळे आता या प्रकरणात महापालिका प्रशासनच अडचणीत आले आहे.***

काँग्रेसचे सदस्य अस्लम शेख यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पातील घोटाळ्याकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. शहरातील कचऱ्याची वाहतूक करणाऱ्या काही ठेकेदारांनी कचऱ्याचे वजन



वाढवण्यासाठी त्यात डेब्रिज मिसळले व त्याआधारे लाखो रुपयांची अतिरिक्त बिले काढल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शेख यांनी महापालिका आयुक्ताकडे तक्रार केली. त्याच्या अनुषंगाने आयुक्तांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. त्यात पाच ठेकेदारांनी कचऱ्यात डेब्रिज मिक्स केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या सर्वावर गुन्हे दाखल करण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने विक्रोळी आणि कुर्ला पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. एवढेच नव्हे तर या सर्व ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची घोषणाही महापालिका आयुक्तांनी केली होती. प्रत्यक्षात मात्र यापैकी एकही कंपनीवर अद्याप कारवाई झालेली नसल्याचे शेख यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. या प्रकरणात ठेकेदारावर कारवाईसाठी अग्रेसर असणाऱ्या महापालिकेने कोणाच्या दबावाने ही कारवाई थांबविली आहे. तसेच कोणाच्या आदेशाने गुन्हा दाखल झाल्यानंतरही पीडब्लूजी कंपनीस घनकचऱ्याचे काम पुन्हा दिले आणि आता एमके एण्टरप्राईजेस कंपनीस अंधेरीतील काम देण्याचा घाट घातला जात आहे, याची चौकशी करण्याची मागणी शेख यांनी केली. ती मुख्यमंत्र्यांनी लगेच मान्य केली.

# टॅक्सी-रिक्षांमध्ये तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक

**मुंबई-** जवळच्या अंतरासाठी टॅक्सी-रिक्षाचालकांकडून भाडे नाकारल्यामुळे होणारा मनस्ताप सर्वसामान्यांसाठी रोजचाच आहे. मात्र या त्रासाचा फटका जेव्हा आमदारांनाच बसतो तेव्हा सरकारला जाग येते. विधान परिषदेत आमदारांनीच टॅक्सी-रिक्षाचालकांकडून भाडे नाकारण्यात येत असल्याच्या तक्रारी केल्या तेव्हा परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सर्व टॅक्सी व रिक्षांमध्ये तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक लावले जातील असे आश्वासन दिले. राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश गजभिये, आनंद ठाकूर तसेच विद्या चव्हाण यांनी विधान परिषदेत आमदारांनाच टॅक्सीवाल्यांकडून कसे भाडे नाकारले जाते याचे किस्से ऐकवले. गोरेगाव येथे रिक्षाचालकांचा त्रास तर खूप मोठा असल्याचे विद्या चव्हाण यांनी सांगितले. वाहतूक पोलीस रिक्षाचालकांच्या मुजोरीवर कारवाई करण्याऐवजी वेगळेच उद्योग करत असतात. अशा वेळी नागरिकांनी तक्रार करायची कोठे असा सवालही आमदारांनी केला. यानंतर रावते यांनी यापुढे सर्व टॅक्सी व रिक्षांमध्ये तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक लावणे बंधनकारक करू असे आश्वासन दिले. मुंबई शहरात रिक्षा व टॅक्सीचालकांविरोधात तक्रारी करावयाच्या असल्यास परिवहन विभागातर्फे १८००२२०११० अशी टोल फ्री व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे तसेच ६२४२६६६६ या हेल्पलाइनवरही नागरिक तक्रारी करू शकतात. २०१३ ते २०१७ या कालावधीत रिक्षा व टॅक्सीचालकांविरोधात ५७१९ तक्रारींमध्ये कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली. ४२०३ अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आल्या आहेत.

# मुंबईतील १०० टक्के बस विजेवर धावणाऱ्या असतील

**मुंबई-** वांद्रे-कुर्ला संकुलात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते, त्यावर उपाय म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने एमएमआरडीए पुढाकार घेत २५ हायब्रीड बस मुंबईकरांच्या सेवेत दाखल केल्या. आज ही संख्या २५ आहे. परंतु येत्या काळात ती हळूहळू वाढवत नेत मुंबईच्या रस्त्यांवरील १०० टक्के बस या विजेवर धावणाऱ्या असतील, यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वाळकेश्वर येथील सह्याद्री अतिथीगृहात २५ हायब्रीड बसचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण झाले, या वेळी ते बोलत होते.

केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते, यू.पी.एस. मदान आयुक्त, एमएमआरडीए, प्रवीण दराडे सहायुक्त एमएमआरडीए, शंकर देशपांडे जॉइंट प्रोजेक्ट डिरेक्टर टाउन प्लॅनिंग, एमएमआरडीए आणि गिरीश वाघ अध्यक्ष,



कमर्शियल व्हेईकल्स ऑफ टाटा मोटर्स यांच्या उपस्थितीत लोकार्पण सोहळा पार पडला.

मुख्यमंत्री म्हणाले की, वांद्रे-कुर्ला संकुलात वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. ते कमी व्हावे आणि येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उच्च दर्जाची व्हावी, यासाठी शासनाकडून हायब्रीड बसचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. एमएमआरडीएमधील लोकांनी स्वत:च्या गाड्यांचा कमीत कमी वापर करत या बसलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी केले.

केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते म्हणाले की, या बसची निर्मिती 'मेक इन इंडिया' अंतर्गत करण्यात आली आहे. त्यासाठी केंद्र सरकारने मदत केली आहे. हायब्रीड बस घेण्यासाठी एमएमआरडीएने संमती दर्शविल्याने बस आज मुंबईत दाखल झाल्या आहेत. मार्चअखेरपर्यंत बेस्टला अशा ८० हायब्रीड बस देण्यात येतील.

00000----------(पृष्ठ १ वरुन)----------00000

# शिवसेना पाठिंबा काढण्याच्या तयारीत!

आहेत. त्यामुळे मंगळवारच्या बैठकीत शिवसेना निर्णयापर्यंत पोहोचण्याची व अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर भाजपा सरकारचा पाठिंबा काढला जाण्याची शक्यता शिवसेनेच्या गोटात वर्तविली जात आहे.

शिवसेनेने पाठिंबा काढल्यास भाजपाला संख्याबळाची जुळवाजुळव करावी लागणार आहे. सेनेच्या काही आमदारांना २०१९ च्या विजयाचे स्वप्न दाखवून जाळ्यात ओढण्याची भाजपाची व्यूहरचना आहे. शिवसेनेसाठी ही चिंतेची बाब आहे. त्यामुळेच काठावरच्या २०-२२ आमदारांना शिवसेनेत रोखून धरण्याचे आव्हान पक्ष नेतृत्वापुढे राहणार आहे. लोकसभेत भाजपाशी युती कायम ठेवून विधानसभेत स्वतंत्र लढावे. दोन्ही पक्षांनी आपल्या लोकसभेच्या जागा 'जैसे थे' ठेवून काँग्रेस-राष्ट्रवादीच्या ताब्यातील जागांबाबत 'चेंज'चा विचार करावा, असाही एक मतप्रवाह सेनेत आहे. शिवसेनेच्या खच्चीकरणाची एकही संधी भाजपाने सोडलेली नाही. सेनेचे मंत्री नाखूश आहेत. मंडळ, महामंडळ, सरकारी वकील, नोटरी, जिल्हा समित्यांवरीलही नियुक्त्या झालेल्या नाहीत. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारमध्ये निधीचे समान वाटप व्हायचे. मात्र युती सरकारच्या बजेटमध्ये आपल्या पक्षाच्या मंत्र्यांना निधी मिळत नसल्याचा सेनेचा आरोप आहे.

## 'प्रकाश आंबेडकरांमुळेच महाराष्ट्र पेटला'

प्रकाश आंबेडकर हे विद्वेषाचं राजकारण करत आहेत. आपण सत्याची बाजू लावून धरत आहोत असं त्यांना वाटतंय. कोरेगाव-भीमा प्रकरणाच्या वेळी त्यांनी जी विधानं केली त्यामुळेच महाराष्ट्र पेटला. त्यामुळे त्यांची चौकशी करण्यात यावी आणि कोरेगाव-भीमाप्रकरणी त्यांना चुकीची माहिती देणाऱ्यांचीही चौकशी करण्यात यावी अशी मागणीही भिडे गुरुजींनी केली. '१ जानेवारीच्या प्रकरणाशी माझा संबंध नाही. तरीही माझं नाव या प्रकरणाशी जोडण्यात आलं. भूत म्हणून जमीन बडविण्याचा हा प्रकार आहे,' असं त्यांनी सांगितलं. कोरेगाव-भीमा दंगलीला नेमकं कोण कारणीभूत आहे? याचा शोध घ्यायला हवा, असं सांगतानाच या प्रकरणात राज्यसरकार बोटचेपी भूमिका घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. आपल्याबद्दल चुकीची माहिती पसरविली जात असल्याने त्याच्या निषेधार्थ येत्या २८ मार्च रोजी राज्यव्यापी मोर्चा काढणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे मुंबईत वाहतूक कोंडी; हायकोर्टात सरकारची माहिती

**मुंबई-** रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे मुंबईत वाहतूक कोंडी होते, अशी माहिती राज्य सरकारच्या वतीने गुरुवारी मुंबई हायकोर्टात देण्यात आली. वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत राज्य सरकारने महापालिकेला काही शिफारशीदेखील केल्या आहेत, अशी माहितीही सरकारने दिली.

'जनहित मंच' या संस्थेने मुंबई हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासह सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सक्षमीकरण करावे, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.



राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल आशुतोष कुंभकोणी यांनी बाजू मांडली. मुंबई महापालिकेला राज्य सरकारने काही शिफारशी केल्या आहेत. यात शहरातील मुख्य रस्त्यांवरील तसेच वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या परिसरातील रस्त्यांची डागडुजी करणे व खड्डे भरणे या कामांचा यात समावेश आहे. तसेच, मुंबईतील रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत राहावी याची जबाबदारी महापालिकेची आहे. खड्डे तसेच खोदकामांमुळे रस्त्याची दुरावस्था झाल्याची माहिती त्यांनी दिली. न्या. नरेश पाटील आणि न्या. जी. एस. कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

# संपादकीय... बंदीचा देखावा नको


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीसाठीचा गुढी पाडव्याचा मुहूर्त जवळ आला असून, प्लास्टिकच्या पिशव्यांबरोबरच ताट-चमचे, टोप्या यांवरही बंदी घालणार असल्याचे पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी विधानसभेत जाहीर केले आहे. प्लास्टिकची विक्री आणि वापर केल्यास तो गुन्हा ठरणार असून, उत्पादक आणि ग्राहक या दोहोंवर दंडात्मक कारवाई होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वाढता वापर, त्यांच्या वाढत्या कचऱ्यामुळे गटारे तुंबण्यापासून जनावरांच्या पोटात प्लास्टिक आढळण्यापर्यंत होणारी हानी आणि विघटन होत नसल्याने प्लास्टिकमुळे पर्यावरणाचे बिघडत असलेले चक्र, हे सारे पाहता त्यांचा वापर थांबविण्यावर भर द्यायलाच हवा. त्या दृष्टिकोनातून गेल्या दोन दशकांपासून पर्यावरण चळवळींकडून मागणी होत असून, कापडी-कागदी पिशव्यांच्या पर्यायी वापराचा आग्रह त्या धरत आल्या आहेत. कमी जाडीच्या प्लास्टिकवर बंदी घालण्याचे प्रयत्नही यापूर्वी झाले आहेत. मात्र, त्याचा विशेष परिणाम झाला नाही; उलटपक्षी प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढतच गेला. प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीच्या ताज्या निर्णयाला ही पार्श्वभूमी आहे. वास्तविक कदम यांनी सहा महिन्यांपूर्वीच बंदीचे सूतोवाच केले होते. कायद्याने बंदी आणण्याच्या आधी मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षण करण्याची आवश्यकताही असते. विशेषतः प्लास्टिक पिशवीसारख्या दैनंदिन जीवनातील अतिशय सवयीच्या वस्तूवरील बंदीबाबत तर सातत्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. मात्र, गेल्या सहा महिन्यांत ना लोकशिक्षणासाठी व्यापक प्रयत्न होताना दिसले ना प्लास्टिक पिशव्यांना पर्यायी ठरू शकतील अशा वस्तूंच्या प्रसार-प्रचार केला गेला. प्लास्टिकच्या पिशव्यांनी जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनात स्थान मिळविले असून, लोक अगदी सहजपणे त्याचा वापर करतात. एकेकाळी आपण कापडी पिशव्यांचा वापर करीत होतो, याचा विसरच बहुतेकांना पडला आहे. याला कारण म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्यांची सहज उपलब्धता आणि त्यांची अत्यल्प किंमत. खरे तर अनेक दुकानदार या पिशव्या मोफतच देतात. यामुळेच भाजी, फळे, औषधे, किराणा सामान आदी सर्वच वस्तू प्लास्टिकच्या पिशव्यांतून आणण्याची सवयच जडली आहे. ती कायद्याच्या बडग्याने मोडण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. मात्र, कायद्याने बंदी आणल्याने अपेक्षित परिणाम साधण्याऐवजी संबंधित वस्तूंचा काळाबाजार वाढतो आणि ग्राहकांना स्वस्तातील वस्तू महागात खरेदी करावी लागते, असा अनुभव आहे. उत्पादकांबरोबर ग्राहकांना पाच हजार रुपयांपासून २५ हजार रुपयांपर्यंत दंड आणि तीन महिन्यांचा कारावास अशी शिक्षा केल्याने प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबेल, असे सरकारला वाटत असेल, तर ते चुकीचे आहे. सुरुवातीच्या काही दिवसांत सरकारी यंत्रणा दक्ष राहील आणि काही जणांवर कारवाई करेल, नंतर व्यवस्था शिथील होईल, हितसंबंधांची साखळी आणखी घट्ट होईल आणि प्लास्टिकच्या पिशव्यांचे अर्थचक्र पूर्ववत सुरू राहील. त्यामुळे या बंदीला दिखाऊ स्वरूप प्राप्त होईल. हा दिखावूपणा टाळायचा असेल आणि बंदीची परिणामकारक अंमलबजावणी करायची असेल, तर दंडात्मक कारवाईच्या बडग्याबरोबरच लोकशिक्षण, पर्यायी वस्तूंची उपलब्धता आणि व्यापक मोहीम यांचा अवलंब करावा लागेल. प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याची; तसेच अंमलबजावणीबाबत तज्ज्ञांची समिती नेमण्याची सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. प्लास्टिकच्या रंगीबेरंगी आणि आकर्षक पिशव्यांनी सर्वसामान्यांना भुरळ घातली असली, तरी त्यांचे विघटन होत नसल्याने पर्यावरणाची साखळी खंडित होते. त्याचे दुष्परिणाम मानवालाच भोगावे लागणार आहेत. या दुष्परिणामांची; तसेच पर्यावरणाच्या साखळीची माहिती देत लोकशिक्षण घडविण्यासाठी सरकारने अभ्यासकांची, पर्यावरण चळवळींची मदत घ्यायला हवी. पर्यावरणाचा समतोल साधण्याचे उत्तरदायित्व आपणा सर्वांचे आहे हे या मोहिमेद्वारे ठसविता येईल. प्लास्टिकच्या पिशव्यांना, ताटांना, कपांना पर्याय उपलब्ध आहे. कापडी-कागदी पिशव्यांपासून पत्रावळ्यांपर्यंतचे हे पर्याय लोकप्रिय करण्यासाठीदेखील ही मोहीम उपयुक्त ठरेल. प्लास्टिकच्या पिशव्यांची गरज भागविणाऱ्या उत्पादकांद्वारेही एक व्यवस्था तयार केली गेली आहे. अनेकांना त्यातून रोजगारही मिळतो आहे. नव्या पर्याय शोधण्यासाठी या व्यवस्थेलाही अवधी द्यायला हवा. अशा सर्व प्रयत्नांनंतर दंडात्मक कारवाईचे पाऊल उचलल्यास बंदी परिणामकारक होऊ शकेल. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या प्लास्टिक बंदीला केवळ कायद्याचे अधिष्ठान न देता त्याला व्यापक जनमोहिमेचे रूप दिले तरच ती परिणामकारक होईल. अन्यथा ती दिखाऊच ठरेल.



# जैत रे जैत?



शेतकऱ्यांवर खूपच अत्याचार झालेला आहे, तेव्हा या वेळी आमचे सरकार आणा अशा प्रकारच्या घोषणा देऊन सत्तेवर आलेल्या भाजप सरकारसमोर आज हजारो फाटके शेतकरी आपल्या मागण्या घेऊन उभे ठाकले आहेत, यात ज्यांना शहरी माओवाद दिसतो त्यांची राजकीय समज आणि जाणीव यांना सर्वात आधी कोपरापासून प्रणाम करूनच आपणास किसान मोर्चाकडे पाहावे लागणार आहे. शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार यांच्यात विधान भवनात झालेल्या चर्चेनंतर हे आंदोलन सोमवारी निवळले. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला जागत गेल्या सात दिवसांपासून अत्यंत शांततेने आणि शिस्तीने हे आंदोलन सुरू होते. त्यात लाल टोप्या आणि लाल झेंडे यांचे प्राबल्य होते. त्यामुळे काहींच्या मनात सत्ताभूत शंकाकुशंका निर्माण होणे स्वाभाविक होते. त्यातून या आंदोलनाबाबत वावड्यांची वावटळ उठविण्याचा प्रयत्न झाला. किसान मोर्चाला तमाम विरोधी पक्षांनी, तसेच शिवसेनेसारख्या अर्धविरोधी पक्षानेही पाठिबा दिला. शेतकरी असंतोषाच्या वादळातील थोडी हवा आपल्याही शिडात भरून घेता आली तर भले असा विचार या पाठिब्यामागे होता. हे सर्व सत्तेच्या राजकारणाचे खेळ. खुद्द भाजपनेही लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत तेच केले होते. आता भाजप सत्ताधारी असल्याने शेतकरी त्याच्यासमोर उभे ठाकलेले आहेत. त्यामुळे हा मोर्चा भाजप सरकारविरोधातील आहे एवढीच काहींची राजकीय समज असू शकते. त्याला नाइलाज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र या मोर्चाबाबत सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला. शेतकरी नेत्यांनीही फार न ताणता, फडणवीस सरकारची आश्वासने स्वीकारली. आंदोलन यशस्वी होऊन संपले. परंतु त्याने काळ्या मातीतील खदखद संपली असे कोणाला वाटत असेल तर तो मोठा भ्रम ठरेल. हा मोर्चा म्हणजे भविष्याच्या पोटात काय दडलेले असू शकते याचा एक संकेत होता. त्याने राज्यातील शेतीप्रश्नाच्या मुळाकडे जाण्याची आवश्यकताच अधोरेखित केली आहे.

शेतीशी निगडित असलेले प्रश्न काही आजचे नाहीत. मोठी परंपरा आहे त्यांना. परंतु गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांमध्ये एक अभूतपूर्व असंतोष निर्माण झाल्याचे दिसते. हा असंतोष गतवर्षी जसा शेतकरी संपाच्या रूपाने वर आला होता, तसाच तो मराठा मोर्चाच्या स्वरूपातही दिसला होता. शेतकरी कर्जमाफीची मागणी घेऊन शेतकरी संप सुरू झाला होता. राज्य सरकारने अखेर कर्जमाफीचा निर्णय घेतला. वस्तुत कर्जमाफी हा ना शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय आहे ना उद्योजकांच्या. कर्जमाफीच्या अनर्थकारी निर्णयांनी प्रश्न सुटत नसतात- ते अधिक बिकट होतात- हा इतिहास आहे. परंतु स्वतच्याच सापळ्यात सापडलेल्या भाजपने येथे कर्जमाफी केली. मात्र त्याच्या अंमलबजावणीत झालेला विलंब आणि घोळ यामुळे या निर्णयाने शेतकऱ्यांचे पूर्णत समाधान होऊ शकले नाही. या दृष्टीने कर्जमाफी ही मलमपट्टी फुकाच गेली. अशा वातावरणात प्रामुख्याने नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांतून किसान मोर्चाचे वादळ उठले. कर्जमाफी हा त्यांच्याही मागण्यांचा एक भाग होता. या मागणीबाबत 'काही तरी करू' असे तोंडभरून आश्वासन सरकारने दिले आहे. मात्र यापूर्वीची शेतकरी आंदोलने आणि हा शेतकरी मोर्चा यांत एक मोठा फरक होता. तो म्हणजे हे आंदोलन शेतकरी असूनही ज्यांना शेतकऱ्यांचा दर्जा मिळू शकलेला नाही अशा आदिवासींचे होते. आजवर शेतकरी प्रश्नाच्या काठावरच उभा असलेला हा घटक. या आंदोलनाने तो पहिल्यांदाच चर्चेच्या केंद्रस्थानी आला. पिढ्यान्पिढ्या आपण शेती करतो, जमीन कसतो, परंतु त्या जमिनीच्या सातबारावर आपले नाव नाही हे या आदिवासी-शेतकऱ्यांचे दुख यानिमित्ताने पहिल्यांदा मंत्रालयाला भिडले. गेले किमान दशकभर ते यासाठी आंदोलन करीत होते. २००६ साली मनमोहन सिंग सरकारने वन हक्क कायदा केला. परंतु आपल्याकडे सगळ्याच कायद्यांचे जे होते, ते या कायद्याबाबतही झाले. मुळात अनेकांच्या, त्यातही खासकरून बड्या खाण कंपन्यांच्या हितसंबंधांना दुखावणारा हा कायदा. त्यामुळे त्याला विरोध होताच. तशात वन खात्यातील बाबूंचाही या कायद्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप नव्हता. वस्तुत आदिवासी हा जंगलाच्या पर्यावरणाचाच एक भाग. तेथेच शेतजमीन तयार करायची, पिकवायची. हा पिढ्यान्पिढ्यांचा उद्योग. ब्रिटिशांनी त्याला त्या जंगलापासून बेदखल केले. वनउपज ही सरकारी मालमत्ता ठरली. वनजमीन सरकारच्या सातबारावर लागली. वन हक्क कायद्याने त्या आदिवासींना, त्यांच्या गावांना पहिल्यांदाच विकासाची संधी देऊ केली. साधारणत कसेल त्याची जमीन हेच त्यातील एक तत्त्व होते. त्याची नीट अंमलबजावणी व्हावी एवढीच या आदिवासींची मागणी होती. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात ती बऱ्यापैकी झालेली आहे. ठाणे-नाशिक पट्ट्यातही ती तशीच व्हावी यासाठी तेथील आदिवासी शेतकरी लढत होते. फडणवीस सरकारने त्यांची ही मागणी मान्य केली. वनजमिनींबाबतचे अनेक दावे सरकारदरबारी पडून आहेत. त्यांचा सहा महिन्यांत निपटारा करण्याचे एक महत्त्वपूर्ण आश्वासन सरकारने त्यांना दिले आहे. या आंदोलनाचे हे मोठेच यश म्हणावे लागेल. आता आदिवासी-शेतकऱ्यांना कमाल चार हेक्टपर्यंत क्षेत्र मिळण्याचा मार्ग त्याने मोकळा केला. आदिवासींनी त्यांची छान संस्कृती जपावी म्हणजे त्यांनी त्यांच्या दारिद्र्यातच खितपत पडावे असे नव्हे. किंवा त्यांनी मुख्य प्रवाहात यावे म्हणजे आपली गावे सोडून शहरांत मोलमजुरी करण्यासाठी यावे असेही नव्हे. मुख्य प्रवाहात येणे याचा अर्थ आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम होणे. त्यांच्या अज्ञान आणि गरिबीवरच ज्यांना राजकारणाच्या पोळ्या भाजायच्या असतात त्यांना हे तत्त्वत नेहमीच पटते. त्यासाठीच्या उपायांना मात्र त्यांचा नेहमीच विरोध असतो. या आंदोलनाने तो विरोध कोसळून पडेल आणि आदिवासींना सातबाराधारक शेतकरी म्हणून मानाने जगता येईल. याशिवाय अत्यंत छोटे छोटे प्रश्न होते त्यांचे. शिधापत्रिका मिळणे, शिधावाटप केंद्रांतून वेळेवर धान्यपुरवठा होणे, निराधारांना, वृद्धांना शासनाकडून मिळत असलेले तुटपुंजे अर्थसाह्य वाढवून मिळावे, या मागण्यांकडे लक्ष वेधले जाण्यासाठी पावले रक्तबंबाळ होईपर्यंत म्हाताऱ्याकोताऱ्या, तरण्याताठ्या, स्त्री-पुरुषांना चालत मुंबईला यावे लागावे हा आपल्या शासकीय असंवेदनशीलतेचाच नमुना. हे प्रश्न सोडविण्याचे आश्वासनही सरकारने त्यांना दिलेले आहे. शेतीला हमीभाव, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी वा उत्तर महाराष्ट्रातील नद्यांचे अरबी समुद्रात वाया जाणारे पाणी वळवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना देणे याबाबत गांभीर्याने विचार करण्याचे, समित्या स्थापण्याचे आणि केंद्राकडे त्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यापलीकडे राज्य सरकार काहीही करू शकत नाही हे स्पष्टच होते. शेतकरी नेत्यांनीही त्या मागण्यांबाबत ताठर भूमिका घेतली नाही हे आजच्या काळात कौतुकास्पदच. एकंदर दोन्ही बाजूंनी चर्चेची भूमिका घेऊन मार्ग काढला, हे चांगले झाले.

# पहाटेपर्यंत बारमध्ये रंगताहेत पाटर्या

## पहाटेपर्यंत चालणाऱ्या बारमुळे शहरात निर्माण झालाय कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न



**नवी मुंबई- पहाटेपर्यंत चालणाऱ्या बारमुळे शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मद्यपींच्या सोयीसाठी काही बार, हॉटेल पहाटेपर्यंत सुरू ठेवले जात असल्याचे उघडपणे दिसत आहे. अशा व्यावसायिकांवर ठोस कारवाईऐवजी महिन्याला पाच हजारांचा दंड आकारून पोलिसांकडून कारवाईचा दिखावा होत असल्याचे दिसून येत आहे.**

शहराच्या संस्कृतीला गालबोट लागेल असे प्रकार काही व्यावसायिकांकडून होत आहेत. त्यामध्ये बहुतांश मद्यविक्रेत्यांसह काही बार व हॉटेल व्यावसायिकांचा समावेश आहे. व्यावसायिक उद्देश साध्य करण्यासाठी त्यांच्याकडून सर्व कायद्यांची पायमल्ली होताना दिसत आहे. यामुळे शहरातल्या अनेक विभागांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. काही हॉटेल व्यावसायिकांकडून उघड्यावरच टेबल मांडून बार चालवले जात आहेत. त्यामुळे त्याठिकाणच्या रस्त्याने ये-जा करणाऱ्या महिला, मुलींना लाजेखातर आपला मार्ग बदलावा लागत आहे. कोपरखैरणेतील क्रासिक व समुद्र हे दोन्ही बार पहाटे सहा वाजेपर्यंत चालवले जात असल्याचे दिसून येत आहे.

दोन्ही बार रहदारीच्या मुख्य रस्त्यावर असल्याने अनेकांनी त्याची पोलिसांकडे तक्रार देखील केलेली आहे. त्यापैकी समुद्र बार ज्ञानविकास शाळेपासून काही अंतरावरच असल्याने शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सकाळी सकाळी तळीरामांचे दर्शन घडत आहे. या प्रकाराबाबत पालकांनीही संताप व्यक्त केला आहे.

प्रवेशद्वाराचे अर्धवट शटर बंद ठेवून हे बार पहाटेपर्यंत चालवले जात आहेत. अशावेळी एखाद्याची तक्रार आल्यास सदर हॉटेल अथवा बारवर पोलिसांकडून दंड स्वरूपात पाच हजार रुपयांची पावती फाडली जाते. त्यानंतर मात्र पुन्हा पुढची तक्रार येईपर्यंत त्याठिकाणी कायद्याची पायमल्ली सुरूच असते. यामुळे प्रत्येक महिन्याला अशा बारवर एकतरी दंडाची कारवाई करून बाजू सावरण्याचा प्रकारच पोलिसांकडून सुरू असल्याचाही नागरिकांचा आरोप आहे.

पहाटेपर्यंत चालणाऱ्या बार व्यावसायिकांकडून पोलिसांना प्रतिमहिना लाखमोलाचे सहकार्य होत असल्याची देखील चर्चा आहे. यामुळे देखील त्यांना कायद्याची पायमल्ली करण्यात पोलिसांकडून सूट मिळत असल्याची शक्यता सर्वसामान्यांकडून वर्तवली जात आहे. तर मद्यविक्री केंद्राबाहेर अथवा पाडलेल्या अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणी उघड्यावर मद्यपानाला थेट उत्पादन शुल्क विभागाकडूनच छुपे पाठबळ मिळत असल्याने त्याठिकाणीही पोलिसांकडून डोळेझाक होताना दिसत आहे.


या प्रकारामुळे रात्रीच्या वेळी मद्यपान करून परिसरात भटकणाऱ्यांकडून गंभीर गुन्हेगारी कृत्य घडल्यानंतर झोपेचे सोंग घेणारे प्रशासन जागे होणार का? असाही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शिवाय, पोलिसांच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त होत आहे.

उशिरापर्यंत बार चालवला जात असतानाही पकडले जाऊ नये याकरिता बिलाच्या मशिनमध्ये फेरफार केला जात आहे. काही बारमध्ये मध्यरात्री दीडनंतर बिलाची प्रिंट दिली जात नाही, तर काहींनी प्रिंट मशिनमधून वेळ हटवली आहे. काहींनी रात्री दीडनंतर प्रिंट होणाऱ्या बिलावर वेळ छापली जाणार नाही असे फेरफार करून घेतल्याचेही समोर आले आहे.

# महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे न उभारणाऱ्या आस्थापनांवर होणार कारवाई

**ठाणे–** राज्यातील शासकीय तसेच खासगी कार्यालये, आस्थापना आणि कारखान्यांमध्ये काम करणा-या महिला कर्मचा-यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्याच्या आदेशाची ४८ तासांत अंमलबजावणी न करणा-या आस्थापना आणि कारखान्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेऊन ४८ महिने उलटले, तरी हे आदेश कागदावरच होते. याबाबत एका वृत्तपत्राने ८ मार्च २०१८, जागतिक महिलादिनी प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची दखल घेऊन या आदेशाची राज्यातील सर्व उद्योगांसह आस्थापनांनी त्वरित अंमलबजावणी करावी, अन्यथा कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रक वृतपत्राचा हवाला देऊन राज्याच्या उद्योग व कामगार विभागाने पुन्हा एकदा गुरुवारी काढले.

राज्यातील अनेक उद्योग व आस्थापनांत अनेक ठिकाणी महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याचे वास्तव महाराष्ट्र शासनाने २०१४ साली जाहीर केलेल्या महिला धोरणातून उघड झाले.




त्यानंतर, १९ जुलै २०१४ रोजी उद्योग व कामगार विभागाने विशेष परिपत्रकाद्वारे काढलेल्या आदेशात म्हटले होते की, ज्या कार्यालयांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह नसेल, त्यांनी येत्या ४८ तासांत तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याची शेड टाकून ते उभारावे तसेच भाडेतत्त्वावरील शासकीय कार्यालयात अशी सोय नसेल, तर त्यांनी मोबाइल टॉयलेटची सोय करावी. यापुढे महिलांसाठी स्वच्छतागृह नसल्यास संबंधित आस्थापना, कारखानामालकांवर खटले दाखल करून दंडात्मक कारवाई करण्याचा तसेच त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण न करण्याचा इशाराही दिला होता. मात्र, हे आदेश निघून ४८ महिने उलटले तरी आजही राज्यातील शहरी भागातील अनेक शासकीय आणि खासगी आस्थापना, कारखाने येथे स्वच्छतागृहे नाहीत. त्यामुळे

दुर्गम, ग्रामीण व आदिवासी परिसरातील दगडखाणी, वीटभट्टींवर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारली गेली असतील, अशी अपेक्षा करणे हास्यास्पद असल्याचे वृत्तपत्रानेने ८ मार्च २०१८ च्या आपल्या वृत्तात म्हटले होते.

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून शासनाने शासकीय सेवेत महिलांना ३० टक्के आरक्षण दिले आहे. शासकीय सेवेत महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, राज्य शासनाने जाहीर केलेल्या महिला धोरणानुसार प्रत्येक कार्यालयात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याची बाब निदर्शनास आल्याने तातडीने हे आदेश काढले होते. मात्र, गेल्या चार वर्षांत आजपर्यंत महिला स्वच्छतागृह नाही, म्हणून ना कुण्या आस्थापना अथवा कारखान्यांचे नूतनीकरण थांबले ना कोणत्या कारखाना, व्यापाऱ्यावर गुन्हे दाखल झाले आहेत.

# वीट व्यवसायावर तिसऱ्या वर्षीही संक्रांत




**विक्रमगड-** विक्रमगड तालुक्यामध्ये विटभट्टी व्यवसायाचे जाळे हे मोठयाप्रमाणात असून आहे. गेल्या तीन वर्षापासून घसरल्याने व्यवसायाला मोठी घरघर लागली आहे. एकेकाळी विटांचा भाव हा चार ते साडेचार हजारापर्यत होता. तो एकदम अडिच ते तीन हजारावर आलेला आहे. तसेच त्यासाठी लागणाऱ्या जिन्नसाही महागल्या आहेत. मागणी आणि निर्मिती मधील या तफावतीमुळे भाव वाढण्याचे संकेत मिळत आहेत. गौण खनिज उत्खन्नाबाबत केंद्रीय वन व पर्यावरण विभागाची परवानगी अनिवार्य केल्याने आवश्यक त्या परवानगी शिवाय रेती, डबर मिळणे कठीण असल्याने सरकारी,निमसरकारी, खाजगी बांधकामे मोठया प्रमाणावर बंद पडली आहेत. त्यातच सिमेंट ब्लॉकलाही बाजारामध्ये मागणी वाढत असल्याने विटांचे महत्व कमी होत चालेले आहे. दरम्यान, विटांसाठी तूस, दगडी कोळसा, माती, भट्टीसाठी जागा, मजूर तात्पुरती बिनशेतीची परवानगी, रॉयल्टी, जमीनीचा धारा आदींसाठी गतवर्षीच्या तुलनेत जादा पैसे मोजावे लागत असल्याने त्याचा परिणाम होऊन किंमतीही वाढल्या आहेत.

# प्रभागात कचऱ्यावर विकेंद्रीत व शास्त्रोक्त पध्दतीने लावली जाणार विल्हेवाट

**ठाणे-** शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर त्याच परिसरात विकेंद्रीत व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार नौपाडा, उथळसर, कळवा, मुंब्रा, वागळे आणि लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समितीमध्ये कंम्पोस्टींग पीट्स उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सहा प्रभाग समितीमध्ये प्रत्येकी ५०० किलोक्षमतेचे हे पीट उभारले जाणार आहेत.

ठाणे महापालिका हद्दीत आजच्या घडीला ८०० मेट्रीक टन कचऱ्याची निर्मिती होत आहे. हा कचरा दिवा येथील डम्पींगवर टाकला जात आहे. तसेच महापालिकेच्या वतीने मागील वर्षभरात कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. काही प्रकल्प सुरु झाले असून काहींवर कार्यवाही सुरु आहे. याशिवाय प्रत्येक सोसायटीने आपला कचरा मार्गी लावावा यासाठी देखील पालिकेने पावले उचलली आहेत. यापुढे जाऊन प्रत्येक प्रभाग समिती मधील निर्माण होणारा कचरा हा त्याच ठिकाणी शास्त्रोक्तपध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेने पावले उचलली आहेत. त्यानुसार शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर त्याच परिसरात विकेंद्रीत व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे.



त्यानुसार वागळे आणि लोकमान्य-सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत या पध्दतीनुसार ५०० किलो क्षमतेचे १० पीट व १ टन क्षमतेचे १५ पीट असे एकूण २५ केपोस्टींग पीट्स उभारले जाणार आहेत. यासाठीची निविदा प्रक्रिया देखील अंतिम झाली आहे. त्यानुसार या कामी एकूण २३ लाख ६९ हजार ४८६ रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. याच पध्दतीचे पीट्स कळवा, मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत देखील उभारले जाणार असून त्यानुसार ५०० किलो क्षमतेचे ९ पीट व १ टनक्षमतेचे १० पीट असे एकूण १९ पीट्स उभारले जाणार आहेत. यासाठी १७ लाख ९ हजार ६४२ रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. तर नौपाडा, उथळसर प्रभाग समितीमध्ये देखील ५०० किलो क्षमतेचे १० पीट व १ टनक्षमतेचे १५ पीट असे एकूण २५ कंपोस्टींग पीट्स उभारले जाणार आहेत. यासाठी २३ लाख २ हजार ३१० रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. त्यानुसार हे तीन प्रस्ताव येत्या २० मार्चच्या महासभेत मंजुरीसाठी पटलावर ठेवण्यात आले आहेत.

# डोक्यात बॅट घालून पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रेंची हत्या

**मुंबई- पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे यांची हत्या डोक्यात बॅट घालून करण्यात आली ही माहिती आता समोर आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरनेच अश्विनी बिद्रेंच्या डोक्यात घालून त्यांना ठार केले अशी कबुली याच प्रकरणातला आरोपी महेश फळणीकरने दिली आहे. महेश फळणीकर हा अभय कुरुंदकरचा खास मित्र आहे. त्याने या हत्याकांडात अभय कुरुंदकरांची साथ दिली असून पोलीस चौकशीत त्याने ही कबुली दिली.**



अश्विनी बिद्रे यांचे हत्या प्रकरण पोलीस अधिकारी दडपण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप अश्विनी बिद्रे यांचे पती राजू गोरे यांनी केला आहे. तसेच अभय कुरुंदकरने फॉरेन्सिक अहवालात फेरफार केले असावेत असाही आरोप गोरे यांनी केला.

नवी मुंबई पोलिसांनी आरोपी महेश फळणीकरला अटक केल्यानंतर त्याने बिद्रे यांची हत्या करुन, मृतदेहाचे तुकडे करुन, मृतदेह कुरंदकरांनी आपल्या फ्रीजमध्ये ठेवल्याची धक्कादायक कबुली दिली होती. त्यानंतर त्यांनी हा मृतदेह वसई येथील भाईंदरच्या खाडीत टाकल्याची धक्कादायक माहिती पोलिसांच्या हाती लागली होती. एप्रिल २०१६ पासून अश्विनी बिद्रे बेपत्ता झाल्या होत्या. मात्र त्या बेपत्ता झाल्या नसून वरिष्ठ पोलीस अधिकारी अभय कुरुंदकर यांनी त्यांना बेपत्ता केल्याचा आरोप बिद्रे यांच्या कुटुंबीयांनी केला. अश्विनी बिद्रे या मूळच्या कोल्हापूर येथील आळते गावातील होत्या. २००५ मध्ये त्यांचा विवाह हातकणंगले येथील राजू गोरे यांच्याशी झाला होता. लग्न झाल्यानंतर वर्षभरात त्या स्पर्धा परीक्षा पास झाल्या आणि त्यांना पोलीस उप निरीक्षक पद मिळाले.

## दिल्लीत एका वर्षाच्या मुलीसोबत बलात्कार

**नई दिल्ली-** पूर्वी दिल्ली येथील प्रीत विहार क्षेत्रात एका वर्षाच्या मुलीसोबत शेजारी राहणाऱ्या एक व्यक्तीने बलात्कार केल्याची बातमी आहे. पोलिसाप्रमाणे ही घटना बुधवार संध्याकाळची आहे जेव्हा मुलगी घराबाहेर बसली होती आणि तिची आई साफ-सफाई करण्यात व्यस्त होती. असलम असे गुन्हेगाराचे नाव आहे. पोलिसाप्रमाणे तो मुलीला आपल्यासोबत स्वत:च्या घरी घेऊन गेला आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला. आईने पोलिसांना सूचित केल्यावर घटना समोर आली. तक्रार नोंदवली असून गुन्हेगाराला अटक करण्यात आली आहे.



# प्लॅस्टिकबंदीचे उल्लंघन केल्यास तीन महिने कारावास

**मुंबई-** प्लॅस्टिकबंदीचे उल्लंघन करणारे उत्पादक, विक्रेते व ग्राहकांना तीन महिन्यांचा कारावास किंवा २५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे, अशी घोषणा पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली.

नंतर कदम यांनी आदित्य ठाकरे यांच्यासह पत्रकार परिषदेत बंदीच्या निर्णयाची माहिती दिली. थर्माकोलवरही गुढीपाडव्यापासून बंदी असेल. राज्यात रोज १८०० टन प्लॅस्टिक कचरा निर्माण होतो. त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. दुधाच्या पिशव्या व पाण्याच्या बाटल्यांना पर्याय उपलब्ध न झाल्याने तेथे प्लॅस्टिकला सध्या बंदी नसेल. पर्याय उपलब्ध करण्यास उत्पादकांना सांगितले आहे, असे कदम म्हणाले. प्लॅस्टिकबंदीचा दर तीन महिन्यांनी सरकारतर्फे आढावा घेण्यात येणार आहे. यासाठी दर तीन महिन्यांनी प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची बैठक घेतली जाणार असल्याचे या वेळी पर्यावरणमंत्र्यांनी स्पष्ट केले.





औषधांचे वेष्टन, वन व फलोत्पादन यासाठी, तसेच कृषी, घनकचरा हाताळताना लागणारे प्लास्टिक, रोपवाटिकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्या वा आच्छादने यांना बंदीतून वगळण्यात आले आहे. मात्र ते कोणत्या कारणासाठी वापरले जाणार हे त्यावर लिहिणे अनिवार्य असणार आहे.

५० मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या दूध पिशव्या तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांना परवानगी दिली आहे. मात्र यांचा पुनर्वापर व पुनर्निर्मिती बंधनकारक असून ग्राहकांनी त्या पिशव्या किंवा बाटल्या परत देण्यासाठी केंद्रे तयार केली जातील. या पिशव्या परत केल्यास ५० पैसे तर बाटल्या परत केल्यास १ रुपया मिळेल.

ज्याचे पुनर्निर्माण होत नाही अशा प्लॅस्टिकवर बंदी असेल. त्यात प्लॅस्टिक, थर्माकोलचे ताट, कप, प्लेट, ग्लास, चमचे, स्ट्रॉ, कटलरी, बॅग्स, स्प्रेड शिट्स, प्लॅस्टिक पाऊच, पॅकेजिंग, सर्व प्रकारचे प्लॅस्टिक वेष्टन यांचे उत्पादन, वापर, साठवणूक, वितरण व घाऊक तसेच किरकोळ विक्री व वाहतुकीवर बंदी राहील.

## थोडक्यात

### मोदी सरकार सूड भावनेनं काम करतेय - सोनिया गांधी

**नवी दिल्ली–** केंद्रातील मोदी सरकार सूड भावनेने काम करत आहे. हूकूमशीही पद्धतीनं हे सरकार सत्तेच्या अहंकारात मदमस्त झाल्याची टीका यावेळी माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी केली. देशाला नवी दिशा देण्यासाठी सर्व प्रकरच्या बलिदानासाठी सज्ज व्हा, अशा शब्दात सोनिया गांधींनी कार्यकर्त्यांना उभारी देण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, अध्यक्षपद स्वीकारल्यावर राहुल गांधींच्या नेतृत्वात आज दिल्लीतल्या इंदिरा गांधी स्टेडियममध्ये काँग्रेसचं ८४ वं राष्ट्रीय अधिवेशन सुरू झालं. या अधिवेशनात सकाळी राहुल गांधींनी मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. राहुल गांधींनीही सकाळी मोदी सरकार समाजात तेढ निर्माण करत असल्याचं आपल्या छोटे खानी भाषणात सांगितलं. यानंतर रविवारी दुपारी राहुल गांधी समारोपाचं भाषण करणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता सोनिया गांधींनीही विद्यमान सरकारवर तोंडसुख घेतलं. मोदी सरकार सूड भावानेनं काम करतंय. हूकूमशीही पद्धतीनं हे सरकार सत्तेच्या अहंकारात मदमस्त झाल्याची टीका यावेळी सोनिया गांधींनी केलीय.

### वृद्ध महिलेवरील बलात्काराप्रकरणी आरोपीला मरेपर्यंत जन्मठेप

**कोल्हापूर–** कोल्हापुरात ९० वर्षाच्या वृद्धेवरील बलात्कारप्रकरणी एका नराधमाला मरेपर्यंत जन्मठेप सुनावण्यात आली आहे. २०१५ मधील या बलात्कारप्रकरणी कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयानं निकाल दिला.

नागणवाडीत ४ मार्च २०१५ रोजी ९० वर्षाची वृद्ध महिला घरात एकटीच होती. तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत आरोपी विष्णू नलवडेनं घरात घुसून तिच्यावर बलात्कार केला. भुदरगड पोलिसांनी घटनेचा तपास करुन आरोपीविरोधात कोर्टात दोषारोप पत्र सादर केलं. यानंतर ९ साक्षीदार तपासण्यात आले. दरम्यान, सरकारी वकीलांनी आरोपीला फाशी शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली होती. त्यानंतर कोर्टाने सरकारी विकालांचा युक्तीवाद आणि पुराव्याना ग्राह्य धरत आरोपी विष्णू कृष्णा नलवडे याला दोषी ठरवत तसेच मरेपर्यंत कारावासाची शिक्षा सुनावली.

### तिरुपती मंदिराकडे बाद झालेल्या २५ कोटींच्या नोटा जमा

**तमिळनाडु-** तिरुपती मंदिराच्या हुंडीत ५०० आणि १ हजारांच्या २५ कोटींचे मूल्य असलेल्या नोटा जमा झाल्या आहेत. या सगळ्या नोटा चलनातून बाद झाल्या आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १ हजाराच्या नोटा चलनातून बाद होतील अशी घोषणा केली. आता तिरूपती मंदिर प्रशासनाकडे ५०० आणि १ हजाराच्या २५ कोटींच्या नोटा आहेत. अनेक भक्तांनी श्रद्धेने या नोटा हुंडीमध्ये टाकल्या आहेत. नोटाबंदीचा निर्णय झाल्यानंतरच्या काही महिन्यांमध्ये या नोटा जमा झाल्या आहेत. तिरुमला तिरूपती देवस्थानने भाविकांनी दिलेल्या दानामागच्या भावना लक्षात घेऊन या नोटा बदलून मिळण्यासाठी आरबीआयला पत्र लिहिले आहे.

# भाजपला कोकणातून हद्दपार करू

**गुहागर–** भाजपला कोकणातून हद्दपार करण्यासाठी आम्ही सर्व नेतेमंडळी एकत्र जमलो आहोत, असे म्हणत शिवसेनेने निर्धार मेळावा केला. यावेळी शिवसेनेने भाजप आणि नारायण राणे यांच्यावर निशाणा साधला. शिवसेना नाणार प्रकल्पाविरोधात शेवटपर्यंत कोकण वासीयांसोबत राहील, अशी घोषणा सेना पदाधिकाऱ्यांनी केली.

याआधी कोकणातील नेते व्यासपीठावर एकत्र कधीही आले नव्हते. पण, निर्धार मेळाव्याच्या निमित्ताने ते एकत्र दिसले. २००९ नंतर पहिल्यांदाच केंद्रीय मंत्री अनंत गीते आणि रामदास कदम व्यासपीठावर एकत्र आले. रामदास कदम म्हणाले, 'भाजपला आम्ही लहान भावासारखा वागवलं. त्यांनीच आमच्या पाठीत खंजीर खुपसलं. भाजप आमचा एक नंबरचा शत्रू असेल.' नाणार प्रकल्पाचा संदर्भ देत ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी पडद्यामागून कोकणात नाणार प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केला तर सेनेचे सर्व मंत्री राजीनामे देतील आणि कोकण वासीयांना घेऊन रस्त्यावर उतरतील. यावेळी रामदास कदम आणि अनंत गीते यांनी राणेंचा स्वाभिमान आता गेला कुठे? असा सवाल करत नारायण राणेंवर टीका केली.



# नीरव मोदीच्या जमिनीवर नगरमधील शेतकऱ्यांच्या कब्जा

**अहमदनगर– देशाला कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणाऱ्या हिरे व्यापारी नीरव मोदीला अहमदनगरमधील शेतकऱ्यांनी दणका दिला आहे. कर्जत तालुक्यातील नीरव मोदीच्या जमिनीवर शेतकऱ्यांनी कब्जा केला आहे. १२५ एकर जमीन शेतकऱ्यांनी पुन्हा ताब्यात घेतली आहे.**




काळी आई मुक्ती संग्रामचा नारा देत घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी जमिनीवर कब्जा मिळवला. खंडाळा गावातील जमीनवर शेतकऱ्यांनी कब्जा केला. काही राजकीय व्यक्तींच्या मदतीनं शेतकऱ्यांनी जमीन ताब्यात घेतली आहे.

जमीन ट्रॅक्टरनं नांगरुन उद्या शेती कसण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला आहे. अत्यंत कवडीमोल भावानं शेती घेतल्याचा शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर शेतकरी आणि महिला उपस्थित होत्या. या जागेवर फायरस्टोन स्टोन कंपनीच्या नावाचा उर्जा प्रकल्प आहे.

नीरव मोदीने कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचं उघड झाल्यावर अंमलबजावणी संचालनालयानं त्याच्या संपत्तीवर टाच आणली. यावेळी ईडीनं त्याच्या खंडाळ्याची जमीन सील केली. तेव्हापासून या जमिनीवर ईडीचा ताबा आहे. मात्र इथला ऊर्जा प्रकल्प सुरुच आहे. जोपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागत नाही. तोपर्यंत या जमीनीवर अंमलबजावणी संचालनालयाची कब्जा राहणार आहे.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी घेतलेला ताबा हा अवैध असल्याचं जाणकरांचं मत आहे. ही जमीन मोदी यांनी थेट न घेता मध्यस्थीच्या माध्यमातून खरेदी केली आहे. या व्यवहाराचे शेतकऱ्यांना पैसे ही अदा करण्यात आले आहेत. तरीही शेतकऱ्यांनी ताबा घेतल्यानं नियमबाह्य असल्याचं सांगितलं जातं आहे. त्यामुळे या प्रकरणी आता अंमलबजावणी संचालनालयाच्या भूमिकेकडं लक्ष लागलं आहे.

# एका बड्या नेत्याच्या मुलाने माझा विनयभंग केला

## खासदाराच्या पत्नीचा गौप्यस्फोट



कोट्टायम - ट्रेनमधून प्रवास करत असताना महिलांना अनेकदा घाणेरडी शेरेबाजी, विनयभंगाचा सामना करावा लागतो. धावत्या ट्रेनमध्ये महिलांवर बलात्कार झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. हा अनुभव सर्वसामान्य महिलांप्रमाणे एका खासदाराच्या बायकोलाही आला होता. केरळ काँग्रेसचे खासदार के. जोश मणी यांच्या पत्नी नीशा जोश यांनी लिहिलेल्या पुस्तकात त्यांच्यासोबत घडलेल्या किळसवाण्या प्रकाराबद्दल लिहलं आहे. धक्कादायक बाब ही आहे की त्यांचा विनयभंग एका बड्या नेत्याच्या मुलाने केला होता. त्याचं नाव मात्र नीशा जोश यांनी लिहिलं नाहीये.

त्रिवेंद्रमला ट्रेनने जात असताना नीशा यांच्या डब्यामध्ये त्यांचा विनयभंग करणारी व्यक्तीही होती. आपण आपल्या सासऱ्यांना बघायला जात असल्याचं त्याने नीशा यांना सांगितलं. नीशा दमल्या असल्याने त्यांना झोपायचं होतं. त्यांनी त्यांच्या राखीव लोअर बर्थवर झोपण्याचं ठरवलं मात्र हा माणूस त्यांना खेटून बसला आणि त्यांच्या पायाला मुद्दाम स्पर्श करायला लागला. आपल्याला झोपायचंय असं सांगूनही तो उठला नाही, आणि संपूर्ण प्रवास आपण प्रचंड अवघडलेल्या अवस्थेत केल्याचं नीशा यांनी म्हटलंय. टीसीला तक्रार करूनही काहीही फायदा झाला नाही, कारण टीसीला राजकारण्यांचा रोष ओढवून घ्यायचा नव्हता असं त्यांनी म्हटलंय.

# बारमध्ये लवकरच एमआरपीनुसार मिळणार दारू? सरकारचा निर्णय

**मुंबई-** लवकरच आता बारमध्येही एमआरपीप्रमाणे दारू मिळण्याची शक्याता आहे. त्यामुळे अव्वाच्या सव्वा रक्कम आकारून दारू विकणाऱ्या बारालकांना चांगला दणका बसणार आहे. पण मद्यपींची चांगलीच चंगळ होणार आहे. उत्पादन शुल्कात १० टक्के वाढ करण्याचा विचारही राज्य सरकार करीत आहे



राज्यातील महसूल वाढवण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलायला सुरू केली असून सर्व बारना एफएल-२ परवाना जारी करण्याच्या विचारात राज्य सरकार आहे. त्यामुळे आता लवकरच बारमध्ये एमआरपीच्या किमतीनुसार दारू मिळणार आहे.

राज्य सरकारने बार मालकांना एफएल-२ हा परवाना दिल्यास बारमधून एमआरपीच्या दरात दारू मिळेल पण, ही दारू विकत घेतल्यानंतर त्यांना बारमध्ये बसता येणार नाही. ते हवे त्या ठिकाणी मद्यपान करू शकतात, असे महसूल विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने माध्यमांना सांगितले.

# योगाचा सृजनात्मक उपयोगच देशाला पुढे नेईल

**अक्कलकोट–** योग ही साधना असून माणसाचे आचार-विचार शुध्द करणारे तंत्र आहे. शरीर आणि मनाच्या अस्वच्छतेसोबत बलशाली राष्ट्र निर्माण करण्याची ताकद योगामध्ये आहे. योगाचा सृजनात्मक उपयोगच देशाला पुढे नेईल आणि उद्योगातून समृध्दी उभारण्यासोबतच देशाला आर्थिक महासत्ता बनवेल असे प्रतिपादन योगगुरू बाबा रामदेव यांनी केले.

अक्कलकोट येथील राजे फत्तेसिंह मैदानावर त्यांच्या योगचिकित्सा शिबीराला प्रारंभ झाला. त्यानंतर योग शिबीर



कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सहकारमंत्री सुभाष देशमुख, विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा शिबीराचे आयोजक सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाबा रामदेव म्हणाले की, भारत आज रोगमुक्ती आणि व्यसनमुक्तीकडे जात आहे. त्याचे श्रेय योगाला आहे. भारत जगात महाशक्ती होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून योगमार्गातून प्रवास सुरू आहे. भारतासाठी हा सुवर्णकाळ आहे. योगाने विश्वबंधुत्वाचा मार्ग दाखविला असून सर्व व्याधी, आजार, नकारात्मक विचार दूर करण्याची शक्ती योगात आहे. योगाचा सृजनात्मक वापरच देशाला जगात अग्रस्थानी पोहचवेल.

### चारा घोटाळा

# चौथ्या खटल्यातही लालूप्रसाद यादव दोषी



चारा घोटाळ्याच्या चौथ्या प्रकरणातही राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांना न्यायालयाकडून कोणता दिलासा मिळालेला नाही. सोमवारी सीबीआयच्या विशेष न्यायालयाने दुमका कोषागार प्रकरणी लालूंना दोषी ठरवलं आहे. सहापैकी चार खटल्यात लालूंवरील दोष सिद्ध झाले आहेत. दुसरीकडे बिहारचे माजी मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यांची मात्र सुटका करण्यात आली आहे. याप्रकरणी लालू प्रसाद यादव आणि जगन्नाथ मिश्रा यांच्यासहित ३१ जणांना आरोपी करण्यात आलं होतं. न्यायालयाने १९ जणांना दोषी ठरवलं असून, १२ जणांची सुटका केली आहे. लालूंच्या शिक्षेवर २१,२२ आणि २३ मार्चला सुनावणी होणार आहे.

न्यायालयाने निर्णय सुनावल्यानंतर आरजेडी नेता रघुवंश प्रसाद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर टीका केली. त्यांनी म्हटलं की, 'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि नितीश यांची खेळी पुन्हा एकदा यशस्वी ठरली आहे'. लालूप्रसाद यादव यांच्यावर चारा घोटाळ्याचे एकूण सहा खटले आहेत, ज्यापैकी तीन प्रकरणांमध्ये शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर आज दुमका कोषागार या चौथ्या प्रकरणी त्यांना दोषी ठरवण्यात आलं. लालूप्रसाद यांच्यावर डिसेंबर १९९५ ते जानेवारी १९९६ दरम्यान दुमका कोषागारमधून १३.१३ कोटी रुपये बोगस पद्धतीने काढल्याचा आरोप आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)